महाराष्ट्र टाइम्स । औरंगाबाद । बुधवार, १८ जुलै २०१८

मराठवाडा पान नं. 6



RAWE

# टोणगावमध्ये जनावरांचे लसीकरण

**औरंगाबाद :** छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेच्या कृषी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी नुकतेच टोणगाव येथे जनावरांसाठी लसीकरण शिबिराचे आयोजन केले होते. ग्रामीण कृषी कार्यानुभवांतर्गत हे शिबिर आयोजित करण्यता आले होते.

या शिबिरामध्ये गावातील १८० जनावरांना फऱ्या आणि घटसर्पाच्या लसी देण्यात आल्या. तसेच, पशुपालकांना जनावरांसाठी जंतनिर्मूलन औषधी व विविध खनिजद्रव्यांचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमामध्ये पशूवैद्यक डॉ. जी. पी. सुरे यांनी मुक्त गोठा संचार पद्धती आणि गोचिड निर्मूलन, तर प्रा. एस. सी. गायकवाड यांनी प्राण्यांच्या समतोल आहाराविषयी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जयाजी सरोदे होते, तर या वेळी दत्तू चौधरी, राजेंद्र कोळगे, भरत चौधरी व बाबासाहेब आहेर उपस्थित होते. अभिषेक थोरातने कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले, तर प्रदीप साळुंके यांनी आभार मानले. या शिबिरासाठी संस्थेचे सचिव पद्माकर मुळे, प्राचार्य डॉ. डी. के. शेळके, प्रा. प्रणिता मुळे यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले.

18.7.2018

C.S.M.S.S. College of Agriculture, Aurangabad
Library